**म. कौ. हिं. सं. अर्ज क्र. ३०/२०२५ – निशाणी १९ लगत आदेश**

सौ. आशा अनिल शिंदे वि. श्री. अनिल जालिंदर शिंदे इ.

CNR No. MHSO20-001031-2025

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र.१ व २ तर्फे त्यांना म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सामनेवाला यांचे कथनाप्रमाणे, अर्जदार हिने सामनेवाला यांचेविरुध्द महिलांचा घरगुती जुलूमापासून संरक्षण कायदा २००५ व नियम २००६, कलम १२ व २१ प्रमाणे अर्ज दाखल केलेला असून यातील सामनेवाला यांना मुदतीच्या आत कागदपत्रांची पुर्तता झाली नसल्याकारणाने मुदतीत म्हणणे देता आली नाही. यातील सामनेवाले हे भिक्षुकी असून ते भिक्षा मागू कुटूंबाची उपजिवीका करतात. त्यामुळे म्हणणे देणेस विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा विलंब माफ होवून न मिळाल्यास यातील सामनेवाला यांचे न भरुन येणारे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. अर्जदारतर्फे सदरच्या अर्जावर म्हणणे मांडले की, सदरचा अर्ज व त्यामधील मजकूर अर्जदार यांना मान्य व कबुल नाही. अर्जात नमुद कारण संयुक्तिक नाही. जाणीवपूर्वक विलंब केलेला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे पडताळणी केली असता सामनेवाला यांना संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत मांडले नाही. महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ व नियम २००६, कलम १२ वरील अर्जाची व्याप्ती पाहता तो प्रथमतः गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. अर्जाचे स्वरुप व विषय पाहता सामनेवालाला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. विलंबाचा कालावधी

लक्षात घेता खर्च सामनेवालावर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**आ दे श**

१. सामनेवाला क्र.१ व २ यांचा अर्ज (नि.क्र.१९) त्यांनी रक्कम रु.३००/– अर्जदारास देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांना म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच दोन्ही पक्षकारांना अर्जाचे कामकाज विनाविलंब चालविण्याचे आदेश देण्यात येत आहे.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.11.01 15:59:17 +0530

दिनांक – ३१/१०/२०२५

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला.

**म. कौ. हिं. सं. अर्ज क्र. ३०/२०२५ – निशाणी १७ लगत आदेश**

सौ. आशा अनिल शिंदे वि. श्री. अनिल जालिंदर शिंदे इ.

CNR No. MHSO20-001031-2025

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र. १ व २ तर्फे त्यांचे विरुध्द झालेला 'विना म्हणणे' चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सामनेवाला क्र. १ व २ यांचे कथनाप्रमाणे, अर्जदार हिने सामनेवाला यांचेविरुध्द महिलांचा घरगुती जुलूमापासून संरक्षण कायदा २००५ व नियम २००६, कलम १२ व २१ प्रमाणे अर्ज दाखल केलेला असून यातील सामनेवाला यांना मुदतीच्या आत कागदपत्रांची पुर्तता झाली नसल्याकारणाने मुदतीत म्हणणे देता आली नाही. यातील सामनेवाले हे भिक्षुकी असून ते भिक्षा मागू कुटूंबाची उपजिवीका करतात. सामनेवाला यांचेविरुध्द विना म्हणणे हुकूम झालेला आहे. सामनेवाले आजरोजी म्हणणे व कैफियत देत आहेत. सामनेवाले यांचे विरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. अर्जदारतर्फे सदरच्या अर्जावर म्हणणे मांडले की, सदरचा अर्ज व त्यामधील मजकूर अर्जदार यांना मान्य व कबुल नाही. अर्जात नमुद कारण योग्य व संयुक्तिक नाही. मुद्दामपणे अर्जाचे कामकाज लांबणीवर पडावे या वाईट हेतूने विलंबाने म्हणणे दिलेले आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे पडताळणी केली असता सामनेवाला यांना संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत न मांडलेमुळे त्यांचे विरुध्द दि.२२/०७/२०२५ रोजी 'विना म्हणणे' आदेश पारित केला आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ व नियम २००६, कलम १२ वरील अर्जाची व्याप्ती

पाहता तो प्रथमतः गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. अर्जाचे स्वरुप व विषय पाहता सामनेवालाला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च सामनेवालावर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आ दे श</u>**

१. सामनेवाला क्र.१ व २ यांचा अर्ज (नि.क्र.१७) मंजूर करणेत येतो.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांचे विरुध्द झालेला 'विना म्हणणे' आदेश रद्द करण्यात येतो. तसेच दोन्ही पक्षकारांना अर्जाचे कामकाज विनाविलंब चालविण्याचे आदेश देण्यात येत आहे.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.11.01 15:59:28 +0530

दिनांक – ३१/१०/२०२५

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Smt. P. R. Kulkarni,<br>Civil Judge, J. D. &<br>J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 01/11/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 01/11/2025 |